पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६४०/२०१८
दिनांक : २८/०९/२०१८

प्रति,

मा......................................
सदस्य, शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा दिनांक **०४/१०/२०१८** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक **०४/१०/२०१८** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.शिक्षण समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – ०७**

**दिनांक : ०४/१०/२०१८** **वेळ : दुपारी २.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक **०४/१०/२०१८** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक **२१/०९/२०१८** रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक ०६**) सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागाअंतर्गत सर्व माध्यमाच्या एकुण 105 शाळा कार्यरत आहेत. शैक्षणिक वर्ष सन 2017-18 रोजीची पटपडताळणी प्राप्त झाली असून सदरच्या पटपडताळणीनुसार/शासन निर्णय क्र.एम.एस.बी. 2006/(301/06) प्राशि 2 दिनांक 26/09/2007 नुसार मनपा प्राथमिक शाळांमध्ये मान्य पदांपेक्षा तसेच विद्यार्थी पटसंख्येनुसार आवश्यकतेपेक्षा जास्त असणा-या शिक्षकांचे समायोजन करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

**(दिनांक ०४/१०/२०१८ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)**

विषय क्र.२) कै.भिकोबा सोपान भुजबळ प्राथमिक शाळा माळवाडी, पुनावळे क्र.१०५ यांचे मार्फत १०० टक्के वाचन व लेखन विकास कार्यक्रम राबविणेत आला आहे. मुख्याध्यापक यांनी अप्रगत विद्यार्थी, अन्य भाषीक विद्यार्थी, विषयनिहाय व स्तरनिहाय विद्यार्थी, यांची माहीती संकलीत करुन प्रमाणात गट तयार १०० टक्के वाचन लेखन विकास कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले त्यामूळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता दर्जा सुधारणा झाल्याचे निदर्शनास आले असल्याने १०० टक्के वाचन लेखन विकास कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभागाचे माहे ११ सप्टेंबर २०१८ व १९ सप्टेंबर २०१८ अखेरचे ९ शासन निर्णय वाचन, माळवाडी प्राथमिक १०० टक्के प्रगत शाळेबाबत, विभागीय पर्यवेक्षक शाळा भेट आढावा अहवालाचे अवलोकन करणे.

विषय क्र.४) समग्र शिक्षा अभियान अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरापलिका कार्यक्षेत्रातील शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी समन्वयक समावेशित शिक्षण 1, समावेशित शिक्षण - विषय तज्ञ 4, विषय साधन व्यक्ती 12, समावेशित शिक्षण – फिरते विशेष शिक्षक 11 अशी विविध पदे कार्यरत आहेत. त्याच्या कामकाजाचे अहवालाचे अवलोकन करणे.

विषय क्र.५) शालेय शिक्षण विभागाने विद्यार्थांचा सर्वांगीण विकास व्हावा याकरिता तसेच शिलसंवर्धन, आरोग्य, हस्तव्यवसाय, स्वावलंबन या शिक्षणातून मुलांवर बालपणात सुसंस्कार करून त्यांच्या व्यक्तीमत्वाला योग्य आकार आणि दिशा देऊन शैक्षणिक गुणवत्ता वाढीवर आदर्श नागरिक घडविणा-या स्काऊट/गाईड या विषयांचा कार्यानुभव विषयांतर्गत समावेश करण्यात आला आहे. संबधित विषयाला आठवड्यातून दोन तासिका देण्यात आल्या आहेत. त्या दृष्टीने बनी टमटोल/कब बुलबुल/स्काऊट गाईड पथक नोंदणी व सामान्य माहिती वर्गाचे आयोजन करणे. पुणे भारत स्काऊट गाईड जिल्हा संस्था, पुणे यांचे दिनांक १९/०७/२०१८ चे मनपा प्राथमिक शाळा/खाजगी प्राथमिक शाळांमधील बनी टमटोल/कब बुलबुल/स्काऊट गाईड या कार्यशाळेचे आयोजन करण्याकरिता शिक्षण विभागाचे अंदाजपत्रकात र.रु.५,००,०००/- तरतूद करणेत आली आहे. सदर कार्यशाळेसाठी प्रस्तावात नमुद प्रमाणे नोंदणीशुल्क आकारणी आवश्यक आहे. परंतु या बाबत आकडेवाडी निश्चित नसल्याने येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६४०/२०१८
दिनांक : २८/०९/२०१८ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.